Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

March -2021

ISSUE No- (CCLXXVI ) 276 - E

## Women's Rights : Status & Goal



Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Executive Editor:
Dr.Virendra K.Jumde
Principal
Dr.Haribhau Admane Arts &
Commerce College Saoner
Dist-Nagpur

Editor:
Dr.Archana D.Patil
Head, Dept. of Pol. Sci,
Dr.Haribhau Admane Arts &
Commerce College Saoner
Dist-Nagpur

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| 24 | कार्यशील महिलाएं एवं मानवाधिकार | डॉ.मीना मावी | 93 |
| 25 | कौटुंबिक हिंसाचार व महिलांचे संरक्षण | डॉ.लोकेश बी. नंदेश्वर | 96 |
| 26 | संविधानातील महिलाविषयक तरतुदी | रुपाली लक्ष्मण राठोड /डॉ .एस.जी.बुटे | 100 |
| 27 | स्त्रियांचे शोषण आणि मानवाधिकार | प्रा.डॉ.केशव सिताराम गोरे | 103 |
| 28 | महिला सक्षमीकरण : एक आर्थिक दृष्टीक्षेप | डॉ. सुधाकर सोनोने | 107 |
| 29 | ग्राम पंचायत प्रशासनातील महीलांचा सहभाग | प्रा.नरेश वा. पाटील | 111 |
| 30 | सिमॉन द बूव्हा : स्त्रीवादाची आदय प्रवर्तक | प्रा. डॉ. भगवान लोखंडे | 117 |
| 31 | ग्रामीण महिला उद्योजक आणि सक्षमीकरण | प्रा. डॉ. संजय मारोतीराव मुंडकर | 125 |
| 32 | लिंगभावाधारीत अर्थसंकल्पात भरीव तरतुद काळाची गरज | प्रा. डॉ. विजय के. बन्सोड | 129 |
| 33 | कृषी उदयोगाच्या विकासातील महिलांचे योगदान | प्रा.डॉ. सुरेश ल. पंडित | 133 |
| 34 | महिला अधिकार सदयस्थिती आणि ध्येय | डॉ.मनीषा द. पवार | 136 |
| 35 | शारीरिक शिक्षणात महिलांचा सहभाग | प्रा. डॉ. तातेराव एकनाथ केंद्रे | 139 |
| 36 | भारतातील स्त्रीयांच्या सामाजिक समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन | प्रा.अमरिष एस. गावंडे | 143 |
| 37 | कोविड–१९ स्त्रियांच्या मानसिकतेचे अध्ययन | प्रा. दिपाली त्र्यंबकराव देशमुख | 147 |
| 38 | भारतातील स्त्रीयांचा राजकीय सहभाग : एक चिकित्सक अध्ययन | डॉ.विजय कृष्णराव काळे | 150 |
| 39 | भारतीय संविधान व महिंलाचे मानवाधिकर | डॉ. बाळासाहेब जी. जोगदंड | 155 |
| 40 | शिक्षणाचा मुलभूत हक्क आणि उच्च शिक्षणातील स्त्रीयांच्या समान संधी समोरील आव्हाने | डॉ. सेलूकर एस. एम. | 160 |
| 41 | भारतीय संविधान आणि महिलांचे अधिकार | कु.स्नेहा सोन्याबापू सोळंके. / अमित नानाभाऊ कुटे | 164 |
| 42 | महिला उद्योजकता विकास काळाची गरज | प्रा.डॉ. रीता देशमुख | 167 |
| 43 | स्त्री भ्रूणहत्या – भारतीय समाजाला लागलेला कलंक | प्रा.डॉ.मोहन काशीनाथ .मिसाळ | 171 |
| 44 | महिलांचे राजकीय सबलीकरण –एक काळाची गरज | प्रा.डॉ के. एम गोलेकर | 174 |
| 45 | Laws of Adoption and women's rights | Dr. Margavi S. Dongare | 178 |




Scanned with OKEN Scanner

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 276(CCLXXVI) E
ISSN : 2278-9308
March, 2021

Late Ramesh Warpudkar (ACS) College Sonpeth Dist. Parbhani

# महिलांचे राजकीय सबलीकरण –एक काळाची गरज

प्रा.डॉ के. एम गोलेकर
( राज्यशास्त्र विभाग ) कै रमेश वरपुडकर महाविद्यालय सोनपेठ जि परभणी

प्रस्तावना ,

आधुनिक काळात महिलाचे राजकीय सबलीकरण महत्वाचे झाले आहे अर्थात जगातील सर्वच देशामध्ये स्त्रीहा घटक उपेक्षित राहिला आहे त्यामुळे 20 शतकापर्यत स्त्रीमुक्ती स्त्रीसबलीकरणाकडे कोणीही गंभीरपणे पाहिले नाही परंतु 20 शतकाच्या शेवटच्या दशकात मात्र हा विषय सार्वत्रिक आस्थेचा बनला त्याला अनेक सामाजिक राजकीय आर्थिक कारणे आहेत राष्ट्रसंघाने तर जागतिक महिला दशक 1975–85 म्हणून घोषीत करून महिला विषयक समस्याची जाणीव जागृती आणि उपाय व्हावी म्हणून विविध उपकम राबविले त्यामधून एक सत्य असे बाहेर आले की जगातील विविध धर्म संप्रदायावर संस्कृती उपसंस्कृतीवर तसेच विविध समुदाय आणि समुहावर पुरूषाचे पाशवी वर्चस्व राहिलेले आहे आणिहे सर्व पुरूषप्रधान झाले त्यामुळेच स्त्रियांना समतेचे आणि प्रतिष्ठेचे स्थान नाही त्यांना दुययम स्थान देण्यात आले आणि म्हणून जगातील सर्वच धर्मांनी संस्कृतीने व विविध समुहांनी समाजाने पुरुष अंहकारालाच खतपाणी घातले हे कटु असले तरी सत्य आहे

वास्तविक जगातील श्रमामध्ये 2/3 वाटा महिलांचा आहे जगातील सर्व संपत्ती महिलांच्या अतिरिक्त श्रमामधून निर्माण झाली आहे तिचा उपभोक्ता मात्र पुरुष आहे त्यामुळे स्त्रीयाच्या श्रमाला कवडीची किंमत दिली गेली नाही चूल आणि मूल हेच तिचे जग राहीले आधुनिक काळात सुध्दा तिचे आर्थिक व लैगिंक शोषण होत आहे स्वताच्या शरीरावर सुध्दा तिची मालकी नाही पुरूषाची वासना क्षमविणे व त्याचा वंश वाढविणे यासाठी कष्ट तिचे आणि स्वामीत्व मात्र पुरुषाचे होते एकीकडे संस्कृतीने देवी म्हणून गौरविले दुसरीकडे मात्र दासी म्हणून वागणूक दिली धनदेवता विद्यादेवता व शक्तीदेवता म्हणून एकीकडे तिची पुजा करण्यातआली पण प्रत्यक्षात तिला धनावर विद्येवर आणि सत्तेवर आधिकार सांगता आला नाही म्हणून राजकीय सबलीकरणाबरोबरच आर्थीक सबलीकरण महत्वाचे आहे वैद्यीक काळात तर ती पुरुषाच्या खांदयाला खादा लावून समाजात वावरली आहे पण तिला पुरूषी अहंकाराने मागे लोटण्यात आले कृती श्री वाणी स्मृती मेघा धृती क्षमा या सप्तशक्तीची ती प्रतीके होती यामुळे ती सबला होती पण कालांतराने पुरुषी अहंकाराने या शक्ती हिरावून घेण्यात आल्या आणि ती अबला झाली

देश स्वांतत्र झाला आणि स्वंतत्र भारताची राज्यघटना महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरानी अथक प्रयत्नांनी निर्माण केली घटनेत 12 ते 35 मध्ये हक्क आणि अधिकार देण्यात येउन सर्वच नागरीकांना स्वांतत्राची सनद दिली गेली देशात कायदयाचे राज्य आहे व कायदयासमोर सर्व समान आहे पण घटनेने दिलेले हे हक्क आणि अधिकार पदरात पाडून घेण्यासाठी सुध्दा संर्धष करावा लागतो

संशोधनाची उदिष्टे

१ राज्यातील स्त्रि–पुरूष समानतेचा अभ्यास करणे

२ स्त्रियांच्या सामाजिक व राजकीय दर्जाचा अभ्यास करणे

३ महिलांचे राजकीय सबलीकरण कारणे परिणाम व उपाय सुचविणे

संशोधन पध्दती

सदरील संशोधन लेखासाठी द्वितीय सामुग्रीचा वापर केला आहे समाजात घडणाऱ्या घटनाची माहिती मिळवून त्याचे विश्लेषन केले आहे तसेच विविध नियतकालीके मासिके ग्रंथ संशोधन लेख इंटरनेट इ वापर करण्यात आला आहे



Scanned with OKEN Scanner

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

महिलांना पुरूषाप्रमाणे समान भूमिका व समान सत्ता कोणत्याही देशाने देउ केली नाही त्यामध्ये भेदाभेद लिंगभेद करून महिलांची घोर उपेक्षा केली आहे त्यांना संधीवचित व राजकीय सत्तेपासून जाणीवपूर्वक दूर ठेवले आहे हे सत्य आहे महिलांचे स्वंतत्र अस्तित्व मान्य करून आधुनिक काळात स्त्रि स्वांतत्र चळवळ इग्लंडमध्ये तर या बाबत लेकवर्न येथे ७ जून १८११ ला रिफॉर्म असोशिएशन स्थापन करण्यात आली तर १८६० मध्ये जे एस मिल याने इंग्लडमध्ये महिलांना मतदानाचा अधिकार मिळावा म्हणून चळवळ चालू केली त्याचा परिणाम म्हणून १८७० ला इंग्लमध्ये स्त्रियांना ३० वर्षी आणि पुरूषांना २१ वर्षी मतदान करता येईल असा अधिकार देण्यात आला पुढे १९२८ मध्ये ही तफावत दूर करण्यात आली १८६९ ते १८९६ याकाळात अमेरिकेने आपल्या विविध राज्यात महिलांना मतदानाचा अधिकार देण्यात आला भारतात ७३ व्या घटना दुरूस्तीने महिलांना ग्रांमपचायत पंचायत समिती व जिल्हा परिषद यामध्ये ३३ टक्के आरक्षण देण्यात आले त्याचा परिणाम महिलांचे राजकीय सबलीकरणाला चालना मिळाली आणि पंचायत राज्यव्यवस्थेला घटनात्मक दर्जा मिळाला

भारतीय समाजातील पुरूषप्रधान व्यवस्थेमध्ये महिलांचा समावेश होउन निर्णयप्रक्रीयेत सहभागी होत आहे शिक्षण आणि समाजप्रबोधन यामुळे विविध आडचणीवर मात करत महिला पुढे येत आहे महाराष्ट्रात तर पंचायत राजव्यवस्थेत ९३००० पेक्षा अधिक महिला उपेक्षित आणिमागास वर्गातून पुढे आल्या आहेत त्यामुळे विविध राजकीय पक्षांनी आपल्या पक्षात महिला आघाडीची स्थापना करून महिलांना जास्तीत जास्त प्रोत्साहन दिले त्यामुळे शासनातील सरंचनात्मक बदल आणि परिवर्तन होण्यास मदत झाली आणि म्हणून समाजातील तळागाळातील नेतृत्वाला संधी मिळाली विकास झाला लोकशाही बळकट होण्यास मदत झाली

सन १९९३ महाराष्ट्रात ग्रामपंचायतीच्या निवडणूका झाल्या आणी त्यामध्ये अनेक पक्षातून महिला उमेद्वार निवडून आले विर्दभ मराठवाडा जळगाव येथे ग्रामपंचायतीमध्ये महिला पॅनल निवडून आले घवघवीत यश मिळाले एवढेच नव्हे तर विर्दभातील सलोद हे पूर्ण गाव हिदुबहुल भाग म्हणून ओळखंला जातो पण तेथून एक मुस्लीम महिला सरंपच म्हणून निवडून आली या सर्व निवडून आलेल्या महिलांनी प्रथम कोणते काम केले असेल तर गावातील दारूची दुकाने बंद करण्यासाठी मोठया प्रमाणात अंदोलने केली कारण ज्या दारूच्या व्यसनामुळे महिलानाअनेक समस्यांना तोड द्यावे लागत होते त्यावर आकमण करून ती दुकाने बंद पाडली आणि म्हणून सत्ता म्हणजे केवळ खुर्ची हे समिकरण न मानता सत्तेतील अधिकार वापरून आपल्या हाक्काविषयी जागृत असणाया महिला जेव्हा निवडून येतात तेव्हा आरक्षणाला अर्थ प्राप्त होतो स्थानिक पातळीवर अनेक मार्गाने होणाया विरोधाला न जुमानता खबीरपणे काम करण्यासाठी महिला मोठया प्रमाणात राजकीय क्षेत्रात येत आहे ही राजकीय सबलीकरणाची नांदी होय

सन २००० साली यूनो ने महिलांपुढील अव्हाने २००० या अहवालामध्ये महिलांची जागतिक स्थिती आणि आकडेवारी प्रकाशीत केली ती अतिशय बोलकी आहे

१ जगात लोंकसख्येमध्ये महिलांचा वाटा ५० टक्के व त्याहून जास्त असला तरी महिलांना शासकिय स्थरावर सर्वाच्च पदावर केवळ १० टक्के महिलांच आहे किंबहूना त्यापेक्षा हे प्रमाण कमी आहे हे अतिशय खेदजनक आहे

२ १९९० मध्ये एकूण मंत्रयामध्ये महिला मंत्री प्रमाण केवळ ३.५ टक्के होते

३ जगातील ९३ देशामध्ये महिलांना मंत्रीपद मिळाले नाही

४ आंतरराष्ट्रीय संस्थामध्ये महिलाना उच्च पदावरील प्रमाण ५ टक्केपेक्षा कमी आहे

५ एप्रील १९९१ मध्ये जगातील एकूण देशामध्ये फक्त ७ देशामध्ये महिला राष्ट्रप्रमुख पदावर होत्या



Scanned with OKEN Scanner

जगातील विविध खंडात महिलांचे संसदेतील प्रमाण पाहिले असता असे दिसून येते की युरोप खंडाच्या उत्तर आणि मध्य भागातील देशात वरिष्ठ सभागृहात १३.४ टक्के तर कनिष्ट सभागृहात १८.९ टक्के आहे तर संयुक्त अमेरिका मध्ये तेच प्रमाण अनुक्रमे १२.६ व ९.१ टक्के आहे तसेच आफ्रिका खंडात हेच प्रमाण अनुक्रमे ८.३ व ८.४ आहे तर आशिया खंडात हे प्रमाण अनुक्रमे ८.८ व ६.२ टक्के आहे आणि दक्षिण अमेरिकेमध्ये हे प्रमाण अनुक्रमे ३.२ व ४.४ आहे

तसेच पाश्चात्य देशात महिलांचे राजकीय सहभाग सुध्दा फार कमी आहे त्याबाबत उदासीनता दिसून येते राजकीय पदावरील महिलांना निवडक देशात सुध्दा ३० टक्के पेक्षा कमी आहे सयुक्त अमेरिकेत हे प्रमाण ५.३ टक्के इंग्लड मध्ये ६.३ टक्के फ्रान्समध्ये ९.९ टक्के व कॅनडा मध्ये सर्वात जास्त म्हणजे १९ टक्केच्या आसपास महिलांचे राजकीय सहभाग आहे

भारताचा विचार केला असता असे दिसून येते की बाराव्या लोकसभेपर्यंत महिलांचे प्रतिनिधीत्व ७.५ टक्केच्या आसपास होते हे खालील कोष्टकावरून स्पष्ट होते

| कमांक | लोकसभा | वर्ष | एकुण सदस्य | महिला सदस्य | महिला सदस्य टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | पहिली | १९५२.५७ | ४८९ | १४ | २.८ |
| २ | दुसरी | १९५७.६२ | ४९४ | १८ | ३.६ |
| ३ | तिसरी | १९६२.६७ | ४९४ | ३० | ६.० |
| ४ | चवथी | १९६७.७१ | ५२० | ३१ | ६.० |
| ५ | पाचवी | १९७१.७७ | ५२० | २० | ३.८ |
| ६ | सहावी | १९७७.८० | ५४२ | १९ | ३.५ |
| ७ | सातवी | १९८०.८४ | ५२९ | २८ | ५.३ |
| ८ | आठवी | १९८४.८९ | ५४२ | ४२ | ७.७ |
| ९ | नववी | १९८९.९१ | ५२३ | २३ | ४.४ |
| १० | दहावी | १९९१.९६ | ५३६ | ३९ | ७.२ |
| ११ | अकारावी | १९९६.९८ | ५३७ | ३९ | ६.७ |
| १२ | बारावी | १९९८.०४ | ५३७ | ४३ | ७.९ |

संदर्भ — महाराष्ट्र राज्य महिला आयोग अहवाल १९९८

विकास प्रक्रियेतील प्राथमिक व महत्वाची गरज म्हणजे महिलांचा राजकीय सहभाग जास्तीत असणे होय पण लैगिंक भेदभावामुळे सत्तेतील समानतेबाबत नकार वाटयाला येतो आणि हीच राजकीय सत्ता समाजावर नियंत्रण ठेवत असते म्हणून समाजात खरोखर समानता आणायची असेल तर महिलांना पुरूषांच्या बरोबरीने सत्तेत वाटा मिळणे गरजेचे आहे

भारतामध्ये विविध कायदे शासनाचे धोरण विविध घटनादुरूस्ती इ मुळे महिलाचा राजकीय सहभाग वाढला असला तरी पुरूषप्रधान व्यवस्थेमूळे राजकीय सहभागावर मर्यादा येतात कारण कमालीची जातीयता आणि पुरूषप्रधान वर्चस्व यामुळे महिलांचा प्रत्यक्ष राजकारणातील सहभागावर मोठा परिणाम होत असतो तसेच राजकारणातील वाढत जाणारी गुन्हेगारी अस्थिर राजकीय परिस्थिती वाढता हिंसाचार बोकाळलेला भ्रष्ट्राचार इ विविध कारणामुळे महिलांना राजकीय सहभाग वाढविण्यामध्ये आडचणी येतात त्यामुळे अनेक महिलांना इच्छा असून देखील राजकीय सहभाग वाढवू शकत नाही आणि नवीन अव्हाने पेलू शकत नाही त्यामुळे राजकीय सहभाग वाढविण्यासाठी राजकारणातील गुन्हेगारी वृत्तीला पायबंद घातला पाहिजे हिंसाचाराला आळा घातला पाहिजे तरच महिलांचे राजकीय सबलीकरण होण्यास मदत होईल



Scanned with OKEN Scanner

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ((SJIF) -7.675, Issue NO, 276(CCLXXVI) E
ISSN : 2278-9308
March, 2021

संदर्भ

१ डॉ शुंभागी गोटे ,महिला सबलीकरण स्वरूप आणि समस्या
२ र वि मुरकुटे , महिला राखीव जागा विधेयक दै मराठवाडा २४ ऑगस्ट १९९७
३ महाराष्ट्र राज्य महिला आयोग अहवाल १९९८
४ निवडणूक आयोग अहवाल महाराष्ट्र राज्य १९९७
५ डॉ सौ नंदिनी तडकलकर चौधरी महिला सबलीकरण २००८

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani



Scanned with OKEN Scanner